SSSTS-53011(11)/123/2023-MECHANICAL

5818/2024

रजि. नं.: ई – ६९, अहमदनगर

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

शिर्डी : पोष्ट : शिर्डी – ४२३१०९, ता. राहाता, जि. अहमदनगर, महाराष्ट्र (भारत)

दुरध्वनी : + ९१ -२४२३-२५८५०० ईमेल- saibaba@sai.org.in वेबसाईट: www.sai.org.in

रजि. ए. डी.

नोटीस

जा. नं. एसएसएसटी/मेकॅनिकल/ 3877 /२०२४

दिनांक : 01 FEB 2024

प्रति,

मे. स्वरुप एन्टरप्राईजेस,

यमुना निवास, हाऊस नं. ६७२,

गणपती मंदिराजवळ,

भगुर, नाशिक- ४२२ ५०५

**विषय :- हार्ड वेअर मटेरियल खरेदीबाबत ...**

संदर्भ :-१ जा. नं. एसएसएस/वशि/मेकॅनिकल/३०५८/२०२३ दिनांक २८.११.२०२३ चा पुरवठादेश

२.आपले दिनांक २७.१२.२०२३ रोजीचे ईमेल पत्र.

श्री साईबाबा संस्थानच्या मेकॅनिकल विभागासाठी बेअरींग, हार्डवेअर मटेरिलय खरेदीकामी दिनांक ६.०२.२०२३ रोजी **GEM Portal** निविदा अपलोड करणेत आली होती. त्यानुसार आपण निविदा सादर केली होती. आपण दिलेल्या दरामधील ऑईलसील व स्टे. स्टील वेल्डींग रॉड करीता दिलेले दर मंजूर झालेने आपणास जा. नं. एसएसएस/वशि/मेकॅनिकल/३०५८/२०२३ दिनांक २८.११.२०२३ अन्वये पुरवठादेश देणेत आलेला होता.

परंतु आपणास सदरचा पुरवठा आदेश दिलेनंतर आपण दिनांक २७.१२.२०२३ रोजीचे ई मेल द्वारे सदरचे मटेरिलय पुरवठा करणेस असमर्थता दर्शविली आहे. त्यामुळे आपण पुरवठा आदेशातील अटी व शर्तीचा भंग करत आहात. मालाचा पुरवठा न केलेने संस्थान प्रशासनाच्या कामात व्यत्यय निर्माण झाला आहे.

तरी आपणास देणेत आलेला पुरवठादेश रद्द करणेत येत असून आपले फर्मचे नाव पुढिल तीन वर्षा कालावधी करीता संस्थानचे पुरवठाधारकांच्या काळे यादीत समाविष्ठ करण्यात येत आहे. आपणास पुढील तीन वर्षाचे कालावधीकरीता संस्थानचे कोणत्याही प्रकारच्या ई निविदा, कोटेशन प्रक्रियेत भाग घेता येणार नाही याची नोंद घ्यावी.

Signed by
Bhikan Deochand Dabhade
Date: 01-02-2024 10:29:01

(बी. डी. दाभाडे)
कार्यकारीअभियंता
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

*प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने*